# पोलीस आयुक्तालय

## मिरा-भाईंदर, वसई-विरार

सेक्टर ०५, रामनगर शांती-गार्डन, मिरारोड (पुर्व) ठाणे ४०११०७

Email ID - pi.sbmb-vv99@mahapolice.gov.in


जा.क्र./वि.शा./टे-४/एस.एस.सी./एच.एस.सी./परिक्षा मनाई आदेश/२०२५-११६७ दिनांक-०१/०२/२०२५

वाचले :-

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ वाशी नवी मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक- मुंविमं/कें.नि./सन २०२५ परिक्षा/ ०१९३, दिनांक १७/०१/२०२५.

२. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) (२) (३)

आदेश :-

**भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) (२) (३) प्रमाणे आदेश**

ज्याअर्थी, उपरोक्त विषय संदर्भान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा तर्फे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) दिनांक ११/०२/२०२५ ते दिनांक १८/०३/२०२५ तसेच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी) दिनांक २१/०२/२०२५ ते दिनांक १७/०३/२०२५ या कालावधीत विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात आल्या आहेत.

ज्याअर्थी महाराष्ट्रात काही ठिकाणी परीक्षा दरम्यान १०० मीटर परिसरात बेकायदेशीर जमाव जमवून गैरप्रकार केले आहेत व परिक्षेत व्यत्यय आणलेले आहेत. त्याप्रमाणे परिक्षार्थी नक्कल करण्यास मदत करण्याची, परिक्षेस व्यत्यय आणण्याची व गैरप्रकार करण्याची शक्यता आहे. परिक्षा चालू असताना पोलीस विभागातील प्राधिकृत केलेले पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच परिक्षा प्रक्रियेशी संबधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी परिक्षेस बसलेले परीक्षार्थी तसेच अंध व अपंग परिक्षार्थी यांचे बरोबर आलेले नातेवाईकांखेरीज अन्य व्यक्ती यांना परिक्षा केंद्रावर व उपकेंद्रावर प्रवेश करण्यास मनाई करणे व १०० मीटर परिसरात जमण्यास प्रतिबंध करणे आवश्यक आहे. याबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी सुहास बावचे पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय मला प्रदान करण्यात आलेल्या शासनाच्या क्र. पी.आर.ओ-०९२०/प्र.क्र.२१७/विशा-२ फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (सन १९७४ चा २) च्या कलम २१ नुसार प्राप्त प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पोलीस विभागातील प्राधिकृत केलेले पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच परिक्षा प्रक्रियेशी संबधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी परिक्षेस बसलेले परीक्षार्थी तसेच अंध व अपंग परिक्षार्थी यांचे बरोबर आलेले नातेवाईकांखेरीज परीक्षा केंद्राच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात बेकायदेशीर जमावास मज्जाव करण्यास तसेच झेरॉक्स सेंटर, फॅक्स सेंटर, टेलीफोन बुथ, यांची दुकाने, सेवा बंद ठेवण्याबाबत व मोबाईल फोन व स्मार्ट वॉच वापर करण्यास मनाई आदेश निर्गमित करीत आहे.

सदरचा आदेश दिनांक ११/०२/२०२५ रोजी ००.०१ वाजे पासून दिनांक १८/०३/२०२५ रात्री २४.०० वाजे पर्यंत परीक्षेच्या दिवसापुरता अंमलात राहील.

Scanned with OKEN Scanner

सदर मनाई आदेशाने प्रभावीत होणाऱ्या व्यक्तींना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) (२) (३) प्रमाणे आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय परीक्षा केंद्र संबधित पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर तसेच सार्वजनिक ठिकाणी स्पष्टपणे सहज दर्शनीय भागात चिकटवून नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक०३/०२/२०२५ रोजी दिलेला आहे.

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

(सुहास बावचे)
पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय)
मिरा-भाईंदर, वसई-विरार

प्रत :-

१) मा.अपर मुख्य सचिव गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) मा. जिल्हाधिकारी, पालघर,ठाणे.
४) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे, पालघर यांना बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी.
५) पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ०१, ०२, ०३ माहिती व कार्यवाही करिता.
६) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती, मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई. यांचे कडे पुढील प्रसिध्द होणाऱ्या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.
७) शिक्षणाधिकारी, (माध्य.) ठाणे व पालघर.
८) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, मि.भा.व.वि.
९) नस्तीकरिता.

Scanned with OKEN Scanner